# अर्थात

## स्मरणिका

मराठी अर्थशास्त्र परिषद ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. १७, १८, १९ नोव्हेंबर, २०१८



आयोजक

सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित

**सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (महाराष्ट्र)**

प्रायोजक

Indian Council of Social Science Research

**भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| • अध्यक्षीय मनोगत | x |
| • स्थानिक कार्याध्यक्षाचे मनोगत | xii |
| • स्थानिक कार्यवाह यांचे मनोगत | xiii |
| • संपादकीय | xv |


## प्रथम सत्र – कार्ल मार्क्स – काल, आज आणि उद्या


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कार्ल मार्क्स यांचा भांडवलशाही विकास सिद्धांत | डॉ. मधुकर वेदपाठक | २ |
| २) | कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या | डॉ. टी. जी. गीते | ४ |
| ३) | कार्ल मार्क्स चे आर्थिक आणि सामाजिक विचार | डॉ. मोहन चौधरी | ६ |
| ४) | क्रांतिकारी विचारवंत कार्ल मार्क्स | प्रा. मुरलीधर गायकवाड | ८ |
| ५) | कार्ल मार्क्स वादळी विचारांचा उहापोह | प्रा. डॉ. उषा पाटील | १० |
| ६) | कार्ल मार्क्स यांचा सामाजिक बदलांचा सिद्धांत | डॉ. विनोद मोरे | ११ |
| ७) | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार | डॉ. हिरालाल चव्हाण | १३ |
| ८) | अभिव्यक्ती कार्ल मार्क्सची अतिरिक्त मूल्य ते श्रमिक शोषण | डॉ. प्रशांत हरमकर | १४ |
| ९) | कार्ल मार्क्सचे आर्थिक तत्वज्ञान | डॉ. सुमित्रा पवार | १५ |
| १०) | कार्ल मार्क्स यांचे अतिरिक्त मूल्य सिद्धांताचे विवेचन | डॉ. सुरेखा भिंगारदिवे | १७ |
| ११) | शास्त्रीय समाजवादाचा जनक कार्ल मार्क्स | डॉ. रमजान मुजावर | १८ |
| १२) | कार्ल मार्क्स भौतिकवादी अर्थतज्ज्ञ – एक सत्य | डॉ. संजय पाटील | १९ |
| १३) | मार्क्सवादाचे विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. रविंद्र पाटील | २० |
| १४) | मार्क्सच्या 'शोषण' संकल्पनेचा सैद्धांतिक आशय | प्रा. दिपक चौधरी | २१ |
| १५) | कार्ल माक्सचे विचार सर्व समावेशक | डॉ. जे. एम. काकडे, प्रा. रविंद्र शेंडे | २२ |
| १६) | मार्क्सच्या अतिरिक्त मूल्य सिद्धांताचे विवेचन | डॉ. संगीता टक्कामोरे | २३ |
| १७) | कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या | डॉ. शाहूराज मुळे, | २४ |
| | | प्रा. डॉ. व्यंकट वडगावे | |
| १८) | कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या | प्रा. सुरेश पाटील | २५ |
| १९) | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार आणि सद्यःस्थिती | प्रा. संजय ठिगळे | २६ |
| २०) | कार्ल मार्क्स आणि भौतिकवाद | डॉ. रामेश्वर भिसे, | २७ |
| | | डॉ. प्राजक्ता पोहरे | २८ |
| २१) | कार्ल मार्क्स यांचे मूल्यविषयक विचार | डॉ. अनिल सत्रे | |
| २२) | कार्ल मार्क्स यांचे मानवी कल्याणकारी विचार | डॉ. सचिन कुंभारे, | २८ |
| | | डॉ. राजेंद्र गव्हाळे | |
| २३) | कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या | डॉ. आस्तिक मुंगमोडे | २९ |
| २४) | कार्ल मार्क्स व्यक्ती आणि तत्वज्ञान | नागनाथ जयवंतराव मनुरे | ३० |




Scanned with OKEN Scanner

 ISSN - 2277-3908

92

# कार्ल मार्क्सचे विचार सर्वसमावेशक

**डॉ. जे. एम. काकडे**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय चंद्रपूर

**प्रा. रविंद्र बा. शेंडे**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
लोकमान्य महाविद्यालय वरोरा,

**गोषवारा**

कार्ल मार्क्सचे विचार स्वीकारता येते. निसर्ग आणि दुर्बल वर्गाचे शोषण केल्याशिवाय आर्थिक विकास करता येतनाही. हीजूनी विचारसरणी आजही कायम आहे. फक्त शोषणाच्या स्वरूपात आणि तीव्रतेत बदल झालेला पहायला मिळतो.समाजवादी, भांडवलशाही आणि मिश्र अर्थव्यवस्था स्विकारणारे सरकारे आर्थिक विकास साधत असताना अजूनही अस्वस्थ आहे. त्यांना सर्वसमावेशक विकासाचा स्विकार करणे भाग पडत आहे. सर्वसमावेशकता व विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे. सर्वसमावेशकता सांभाळत असतांना विकासाकडे झालेले दुर्लक्ष, आणि विकास साधत असतांना सर्वसमावेशकते कडे झालेले दुर्लक्ष दुरूस्त करण्याची क्षमता सर्वसमावेशक विकासात आहे. खरोखर अशा संतुलनासाठी मार्क्सचे विचार वास्तविक विकासासाठी स्विकारने कोणत्याही अर्थ व्यवस्थेला पोषक आहे. मार्क्सचे विचार अर्थव्यवस्थेच्या संतुलनासाठी आहे हे प्रथमता सर्व अर्थव्यवस्थे ने विचारात घेणे गरजेचे आहे. आज असंतुलन जे निर्माण झाले आहे. त्यात मार्क्सच्या विचारसरणीव्दारे संतुलन साधता येते.

मार्क्सला अभिप्रेत असलेला सुवर्णकाळ अस्तीत्वात आणता येते. कारण भांडवलशाही, समाजवादी आणि मिश्र अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकास हेच दर्शविते की विकास हा सर्वसमावेशक असेल तो टिकाऊअसतो. आज सर्व अर्थव्यवस्था ना कृत्रिम विकासा ऐवजी सर्व समावेशक विकास हवा आहे. कार्लमार्क्स यांच्या मते वाद (Thesis) प्रतिवाद (Ante-Thesis) संवाद (Synthesis) अशी विकासाची प्रक्रिया आहे. प्रत्येक राष्ट्रात कार्यरत असणाऱ्या अर्थव्यवस्थापर स्परविरोधी आणि परस्पर पुरक आहेत असे मानल्या सत्यांच्या समन्वयातून नव्या स्वरूपाचे संघटन अस्तित्वात येते आणि अशा नव्या स्वरूपाच्या संघटना मार्फत शाश्वत व सर्वसमावेश विकासाचा राजमार्ग मजबूत करता येते.

कार्ल मार्क्सचे(१८१८-१८८३) तत्वज्ञान स्विकारल्यास, नव्या स्वरूपाच्या संघटना मार्फत प्रत्येकाच्या हातात साधने दिली जातील. त्यांचे वापर कौशल्य विकसीत असल्यास ''सदकाळक्रांती'' प्रत्येक क्षेत्रात पाहायला मिळेल. सद्यस्थितित प्रत्येक अर्थव्यवस्थेत जे असंतुलन पहायला मिळत आहे. त्या असंतुलनासाठी कार्ल मार्क्सचे मुख्य विचार व दुर्लक्षित विचारात समन्वय साधुन सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन विस्तृत व सखोल करता येते. हे खरे आहे.

93

मराठी अर्थशास्त्र परिषद ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन
ISSN - 2277-3908

# कार्ल मार्क्सचे विचार सर्वसमावेशक

**डॉ. जे. एम. काकडे**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय चंद्रपूर

**प्रा. रविंद्र बा. शेंडे**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
लोकमान्य महाविद्यालय वरोरा.

### प्रस्तावना

कार्ल मार्क्सचे विचार स्वीकारता येते. निसर्ग आणि दुर्बल वर्गाचे शोषण केल्याशिवाय आर्थिक विकास करता येत नाही. ही जूनी विचारसरणी आजही कायम आहे. फक्त शोषणाच्या स्वरूपात आणि तीव्रतेत बदल झालेला पहायला मिळतो. समाजवादी, भांडवलशाही आणि मिश्र अर्थव्यवस्था स्विकारणारे सरकारे आर्थिक विकास साधत असताना अजूनही अस्वस्थ आहे. त्यांना सर्वसमावेशक विकासाचा स्विकार करणे भाग पडत आहे. सर्वसमावेशकता व विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे. सर्वसमावेशकता सांभाळत असतांना विकासाकडे झालेले दुर्लक्ष, आणि विकास साधत असतांना सर्वसमावेशकतेकडे झालेले दुर्लक्ष दुरूस्त करण्याची क्षमता सर्वसमावेशक विकासात आहे. खरोखर अशा संतुलनासाठीमार्क्सचे विचार वास्तविक विकासासाठी स्विकारने कोणत्याही अर्थव्यवस्थेला पोषक आहे. मार्क्सचे विचार अर्थव्यवस्थेच्या संतुलनासाठी आहे हे प्रथमता सर्व अर्थव्यवस्थेने विचारात घेणे गरजेचे आहे. आज असंतुलन जे निर्माण झाले आहे. त्यात मार्क्सच्या विचारसरणीव्दारे संतुलन साधता येते.

मार्क्सला अभिप्रेत असलेला सुवर्णकाळ अस्तीत्वात आणता येते. कारण भांडवलशाही, समाजवादी आणि मिश्र अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकास हेच दर्शविते की विकास हा सर्वसमावेशक असेल तो टिकाऊ असतो. आज सर्व अर्थव्यवस्थांना कृत्रिम विकासाऐवजी सर्वसमावेशक विकास हवा आहे.

### संशोधनाची उदिष्टये

१) मानवी व्यवहागवर आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांचा प्रभाव पडतो. मार्क्सनेआर्थिकेत्तर घटकांकडे केलेल्या दुर्लक्षांचा अभ्यास करणे.
२) समाधानी कामगार वर्ग का निर्माण झाला नाही? याचा अभ्यास करणे.
३) पूर्ण समाजवादी अर्थव्यवस्था आणि पूर्ण भांडवलशाही अर्थव्यवस्थेऐवजी मिश्र अर्थव्यवस्था सुवर्णमध्य आहे.याचा अभ्यास करणे.
४) ''साध्य एकच साधने वेगवेगळी'' या दृष्टिकोनातून मार्क्सच्या विचाराचा अभ्यास करणे.
५) शोषणाचे मूळ उच्चाटण आणि विकास करण्यासाठी स्थापन झालेल्या सरकारी व गैर-सरकारी संस्थांचा अभ्यास करणे.

### संशोधनाची गृहीते

१) कार्ल मार्क्सचा दृष्टीकोन भावनांवर आधारलेला नसून शास्त्रीय आहे.
२) मार्क्सचे विचार जास्त सर्वसमावेशक विकासासाठी वापरता येते.

### संशोधन पध्दती

शोधनिबंधाचे शिर्षक, उदिष्टये, गृहिते, विषयाच्या भविष्याची चिंता व उपाययोजना लक्षात घेऊन दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये पुस्तके, संशोधन पत्रिका, दै. वृत्तपत्रे इ. समावेश आहे.

शोधनिबंधाच्या पहिल्या भागात मार्क्सने आर्थिकेत्तर घटकांकडे केलेल्या दुर्लक्षांचा अभ्यास करण्यात आला आहे. दुसऱ्या भागात समाधानी कामगार वर्ग का निर्माण झाला नाही, तिसऱ्या भागात समाजवादी व भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय मिश्र अर्थव्यवस्था होऊ शकते काय? याचा अभ्यास करण्यात आला आहे. चौथ्या भागात शोषणाचे मूळ उच्चाटण व विकास करण्याच्या हेतूने विविध सरकारी व गैरसरकारी संस्थांचे योगदान याचा अभ्यास करण्यात आला आहे आणि पाचव्या भागात (समारोपीय भागात) मार्क्सचे समग्र विचार स्विकारल्यास जास्त सर्वसमावेशक विकास निर्माण करता येते, यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.



Scanned with OKEN Scanner

ISSN - 2277-3908

**आर्थिकेत्तरही घटकांचा मानवी व्यवहारावर प्रभाव**

आर्थिक व्यवहाराची प्रक्रिया इतकी गुंतागुंतीची, व्यापक आणि विविधतापूर्ण असते की नक्की कोणकोणत्या घटकांचा आर्थिक व्यवहारावर परिणाम होतो, हे ठरविणे कठीण असते. आर्थिक व्यवहारावर परिणाम करणारे आर्थिक व आर्थिकेत्तर घटक सारखेच महत्वाचे आहेत. मार्क्सने आर्थिक घटक विचारात घेतले आहे आणि आर्थिकेत्तरघटकांकडे दुर्लक्ष केले आहे. आर्थिकेत्तर घटकांचे तंतोतंत मापण करता येत नसले तरी आर्थिक व्यवहारावर दोनही घटकांचा प्रभाव कमी-जास्त पाहायला मिळतो. विकासासाठी आवश्यक असे सामाजिक वातावरण हे घटक तयार करतात. प्रो.ए.के. केनक्रास;।ण्झ ब्यतदवतवेद्ध च्या मते विकासाची बिजे लोकांच्या मनात आणि त्या देशातील संस्थांच्या विचारात असतात.

आर्थिकेत्तर घटक पुढीलप्रमाणे आहेत १) कार्यक्षम आणि स्थिर सरकार २) प्रगतीशील सामाजिक व सांस्कृतिक वातावरण ३) सामाजिक न्याय ४) धार्मिक दृष्टिकोन ५) मनोवैज्ञानिक घटक ६) कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती ७) नैतीक मूल्ये

देशात लहान-लहान बाबींवरून जसे भाषा, जात, धर्म, प्रादेशिक सिमा किंवा आतंकवाद यावरून संघर्ष व भांडणे होत असल्यास अशा देशात सुरळीत आर्थिक विकास होणे शक्य नाही.

आर्थिक व आर्थिकतेवर घटकांचा एकत्र आर्थिक व्यवहारावर प्रभाव होतो. हे लक्षात घेऊन मार्क्सचे विवेचन उपयोगात आणल्यास, जास्त सर्वसमावेशक विकास निर्माण करणे कठीण असले तरी शक्य आहे.

मार्क्सच्या तत्वानुसार सर्व ऐतिहासिक घटनांवर आर्थिक परिस्थितीचा प्रभाव पडतो आणि त्यानुसार घटना घडत जातात. हा मार्क्सचा पुर्वग्रहदुषीतपणा खरा असला तरी तो बदलविणे आवश्यक आहे. सहकाऱ्यांवर विश्वास ठेवावा लागतो. विश्वास हा आर्थिकेत्तर घटकात मोडतो म्हणजेच, आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांचा प्रभाव मानवी व्यवहारावर होतो. यात चांगला समन्वय जुळल्यास. साधनांचा परीपूर्ण वापर होऊन सर्वसमावेशक विकास मिळविता येते.

**समाधानी कामगार वर्गाची अजूनही निर्मिती नाही - मध्यम वर्गामुळे**

प्राचीन साम्यवादी अवस्थेत (सुवर्णकाळ) उत्पादनाच्या घटकांवर समाजातील ज्या व्यक्तींची मालकी असते आणि त्यांचे नियंत्रण असल्यामुळे ते आपल्या गरजेनुसार उत्पादन करतात. उरलेल्या तीन अवस्थांमध्ये (पुरातन गुलाम अवस्था, सरंजामशाही, भांडवलवाद) पिळवणूक करणारे आणि पिळू जाणारे हे दोन वर्ग पाहायला मिळतात. या दोन वर्गाचे नावे वेगवेगळया अवस्थेत फक्त बदलली आहे व स्वरूप कायम आहे. (उदा.जमिनदार- कुळ) परंतु भांडवलशाही अवस्थेतून मध्यम वर्ग निर्माण झाल्यामुळे समाधानी कामगार वर्ग अजूनही निर्माण झाला नाही. मालक आणि कामगार या दोन वर्गातील दरी कायम ठेवण्याचा प्रयत्न या मध्यम वर्गामार्फत होतांना दिसते.

उत्पादन प्रक्रियेत निर्णय घेण्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे तज्ज्ञ लागतात हा वर्ग उत्पन्नाच्या साधनांचा मालक नसला तरी त्या वर्गाकडे असलेली माहीती व ज्ञान हे फार महत्त्वाचे असल्याने त्यांना लठ्ठ पगार असतो. त्यांना आपण नवश्रीमंत असे म्हणू शकतो. त्यांचा प्रयत्न नेहमीच मालकवर्गाबरोबर राहण्याचा आणि त्यांचीच नक्कल करण्याचा असतो. या परिस्थितीत मार्क्सच्या अपेक्षेप्रमाणे दोनच वर्ग तयार न होता हा नवीन ''मध्यम वर्ग' तयार होतो. त्यातही दोन भाग आहे. उच्च मध्यमवर्ग, जो मालक वर्गाच्या जवळ आहे आणि कनिष्ठ मध्यम वर्ग, जो कामगार वर्गाच्या जवळ आहे. या मध्यम वर्गात जरी सर्व पगारी नोकरच असले तरी त्यांच्यात एकमेकांशी स्पर्धाच अधिक असते, एकसंधपणा नसतो. त्यामुळे मार्क्सच्या संकल्पनेप्रमाणे ते ''कामगार वर्ग' या एकाच छत्राखाली येणे जवळजवळ अशक्य आहे.

भांडवलवादातून मध्यम वर्गाची निर्मिती आणि यातील दोन गट यामुळे समाधानी कामगार वर्ग निर्माण झाला नाही. दोन वर्गातील अंतर कायम ठेवण्यासाठी या वर्गाची भूमिका मोठी असल्यामुळे शोषण कायम आहे. कनिष्ठ मध्यम वर्ग कामगारांच्या बाजूने असल्यामुळे शोषणाची तीव्रता कमी झालेली पाहायला मिळते, परंतु शोषण कायम आहे. पुढे पूर्ण स्वरूपात मध्यम वर्ग कामगार वर्गात समाविष्टझाल्यास भांडवलशाही नष्ट होऊन समाजवाद म्हणजे समाधानी कामगार वर्ग निर्माण होईल. हे खरे आहे.



Scanned with OKEN Scanner

ISSN - 2277-3908

**साध्य एकच साधने वेगवेळी**

एकच लक्ष निरनिराळया पध्दतीने साध्य करता येते. प्रत्येक राष्ट्राला आपली आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थिती विचारात घेऊन योग्य अशा तंत्राची निवड करावी लागते. तंत्र निवड असतांना सर्वात महत्वाची जी गोष्ट विचारात घ्यावी लागते ती अशी की जमीन, पाणी, पर्यावरण, सौर उर्जा अशा सर्व साधनांचा वापर करणारी लोकसंख्या ही कौशल्यपूर्ण असावयास हवी. साधने वापरण्याबाबत कौशल्य विकसीत असल्यास, सर्व साधनांचा पर्याप्त वापर होऊन प्रत्येक पिढीला आनंद मिळणारा आहे. यातूनच सर्वसमावेशक विकासाचा राजमार्ग मजबूत बनतो.

आज भांडवलशाही अर्थव्यवस्थेत समाजवादी अर्थव्यवस्थेची काही तत्वे वापरण्यात येत आहे. उदा.सबसीडीच्या नावाखाली विविध सोयी श्रीमंत राष्ट्रे आपल्या शेतकऱ्यांना उपलब्ध करून देत आहे.

मिश्र अर्थव्यवस्था स्विकारणारे भारतासारखे देश आज भांडवलशाही अर्थव्यवस्थेची नक्कल करीत आहे. नावापुरती मिश्र अर्थव्यवस्था शिल्लक आहे याचा परिचय बरेचदा पहायला मिळतो.

समाजवादी अर्थव्यवस्था स्विकारणारे देश, सत्तेवर असणारा राजकीय गट पहिलेसारखे प्रामाणीक नसल्यामूळे त्यांचे बरेच निर्णय चूक ठरतात अशी ओरड करत आहे. म्हणजेच कोणतीही अर्थव्यवस्था स्विकारणारे देश विकास साधत असतांना अस्वस्थ असलेली दिसते. वास्तविक विकासावर कृत्रिम विकास वरचड झालेला दिसत आहे.

अशा या अस्थिर अवस्थेत कोणती अर्थव्यवस्था योग्य आहे यांचे उत्तर मार्क्सच्या तत्वज्ञानात आहे. परंतु सत्तेवरी गटांनी विश्वस्ताची भूमिका वटविल्यास समाजवादी अर्थव्यवस्था योग्य ठरते नाही तर मार्क्स चे काही विचार आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पाठींबा देणारे विचार यातून मिश्र अर्थव्यवस्थेचा विचार पुढे येत असलेला दिसतो.

पुढे प्रत्येक राष्ट्राला मिश्र अर्थव्यवस्थेचा आधार घ्यावा लागेल असेच चित्र तिनही अर्थव्यवस्थेच्या गुणदोषावरून पहायला मिळतात. अशा मिश्र अर्थव्यवस्थेत मार्क्सचे विचार (थोडे बदल करून) स्विकारने आवश्यक आहे.

**गैर-सरकारी व सरकारी संस्थांचे योगदान- शोषण व विकासातील**

विज्ञानाच्या प्रगतीबरोबर मानव जातीला सर्व विनाशाची लक्षणे दिसू लागतील म्हणून ''जगा आणि जगू द्या'' हे तत्व सर्वमान्य झाले. या पृथ्वी तलावर प्रत्येक मानसाची गरज भागविण्याइतकी साधनसंपत्ती आहे. परंतु एका व्यक्तीची सुध्दा ''हाव'' पुरी करण्यास ती अपुरी पडेल. ही मर्यादा ओळखून विकासाचा प्रवास करणे अपेक्षित असलेले दिसून येते. मार्क्सचे तत्वज्ञान सहकार आणि गैर-सरकारी संस्थांना अतिशय प्रेरणादायी ठरले आहे. शोषनाचे मुळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न आज गैर-सरकारी व सरकारी संघटनेमार्फत आंतराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा , तालुका आणि ग्रामीण पातळीवर सुध्दा होत आहे. तळागाळातील लोकांना मदतकरण्यासाठी किंवा स्वावलंबी बनविण्यासाठी नि:स्वार्थ बुध्दीने काम करणाऱ्या लोकांकडून चालणारी संस्था म्हणजे सेवाभावी संस्था होय. प्रत्येक राष्ट्राचे अंतर्गत व बाहय स्वरूप बदलविण्यासाठी अशा संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कायदेशीर आणि नैतिकतेचा आधार मिळाल्यास शेवटचा पात्र व्यक्तीलासुध्दा प्रत्येक वेळी चांगल्या संधी मिळणाऱ्या आहे. शोषणातून बाहेर काढण्यासाठी विमा कंपनीसारखी भूमिका गैर-सरकारी संस्था करीत आहे. तसेच विकासाचे प्रवेशव्दार म्हणून अशा संस्थांचे योगदान मोठे आहे. विम्याव्दारे सर्व दु:खाची भरपाई काढता येत नसली तरी अनिश्चितांना तोंड देण्याची क्षमता निर्माण होते. अगदी त्याचप्रमाणे गैर-सरकारी व सरकारी संस्थांमार्फत शोषनाची तीव्रता, मूळ उच्चाटन आणि विकास करण्याची क्षमता शेवटच्या पात्र व्यक्तीलसुध्दा मिळतांना दिसून येते.

''मासे विनामूल्य देण्यापेक्षा, मासे पकडण्यास शिकवावे'' आत्मनिर्भर प्रत्येक घटकाला करणे हे अंतिम लक्ष्य सेवाभावी संस्थांनी सतत लक्षात ठेवावे. सेवाभावी संस्था व सरकारी संस्था यात चांगला समन्वय असल्यास शोषणाच्या तीव्रतेबरोबर, शोषणाचे मूळ उच्चाटन होऊन सर्वसमावेशक विकास साधने शक्य आहे.

कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानात असाच भाग असल्यामुळे आज शोषण शून्य करण्याचा प्रयत्न पुर्ण विकसीत आणि अपूर्ण विकसीत अर्थव्यवस्थेत होतांना दिसून येते. परंतु आज फक्त शोषणाची तीव्रता कमी झालेली अशा संस्थामार्फत दिसते. अशा संस्थांची कृती अविरत असल्यास, या संस्थांत असलेले विविध दोष कमी किवा शून्य असल्यास, देशाचे अंतर्गत व बाहय स्वरूप बदलून ''व्हावे कल्याण सर्वांच

ISSN - 2277-3908

कोणी दुःखी असु नये'' इथपर्यंत पोहचण्यासाठी, अशा संस्थांची भूमिका महत्वपूर्ण राहील आणि मार्क्सचे विचार या सर्व गोष्टीसाठी एक मोठा प्रेरणा स्त्रोत आहे. हे नाकारता येत नाही.

**समारोप**

कार्ल मार्क्स यांच्या मते वाद (Thesis) प्रतिवाद (Ante-Thesis) संवाद (Synthesis) अशी विकासाची प्रक्रिया आहे. प्रत्येक राष्ट्रात कार्यरत असणाऱ्या अर्थव्यवस्था परस्पर विरोधी आणि परस्पर पुरक आहेत असे मानल्यास त्यांच्या समन्वयातून नव्या स्वरूपाचे संघटन अस्तित्वात येते आणि अशा नव्या स्वरूपाच्या संघटनामार्फत शाश्वत व सर्वसमावेश विकासाचा राजमार्ग मजबूत करता येते.

कार्ल मार्क्सचे (१८१८-१८८३) तत्वज्ञान स्विकारल्यास, नव्या स्वरूपाच्या संघटनामार्फत प्रत्येकाच्या हातात साधने दिली जातील. त्यांचे वापर कौशल्य विकसीत असल्यास ''सदकाळ क्रांती'' प्रत्येक क्षेत्रात पाहायला मिळेल.सद्यस्थितित प्रत्येक अर्थव्यवस्थेत जे असंतुलन पहायला मिळत आहे. त्या असंतुलनासाठी कार्ल मार्क्सचे मुख्य विचार व दुर्लक्षित विचारात समन्वय साधुन सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन विस्तृत व सखोल करता येते. हे खरे आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१) अर्थसंवाद एप्रिल-जून २०००, खंड २४, अंक १ पृष्ठ क्रं १५ ते ३०
२) कुलकर्णी बी.डी व ढमढेरे एस.व्ही., आर्थिक विचार व विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०११. पृ.क्र. ८२ ते १००
३) डोळे बा. म व कुलकर्णी स.न., ग्रामीण विकाससंबंधी बिनसरकारी व सेवाभावी संस्थांचा दृष्टीकोन. यशवंतराव चव्हान महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २०००
४) देशपांडे स.ह., काही आर्थिक काही सामाजिक, मौज प्रकाशन,मुंबई,२०००. पृ.क्र १ ते ४६.
५) देशपांडे आ.श्री.व देशपांडे वि.आ.,भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास)., हिमालया पब्लिकेशन नागपूर २०१०, पृ.क्र. ५२४ ते ५३३
६) दै.लोकसत्ता (विविध लेख)

■■■■